INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | MARCH – 2017

# ‘नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे अध्ययन’

**प्रा.अशोक सुखदेव राठोड[१] , प्रा.डॉ.सुरेंद्र अंबर मोरे[२]**
[१]सहाय्यक प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग, महाराज जे. पी. वळवी कॉलेज, धडगाव. जि. नंदुरबार .
[२]सहयोगी प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग प्रमुख, झेड.बी.पाटील महाविदयालय, धुळे. जि. धुळे.

गोषवारा :- **(Abstract)**

स्वातंत्र्या नंतर लोकशाही विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने पंचायतराज संस्थांची स्थापना करण्यात आली. मात्र, लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रिया, मागासवर्गीय, आदिवासी आणि आर्थिक दृष्टया गरिब या घटकांना सहभाग व समावेशनाची संधी पासुन वंचित राहिल्याचे दिसुन येते. प्रामुख्याने भारताच्या एकुण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ४८.४५ टक्के असुन २०१४ च्या लोकसभा निवडणुकी मध्ये ११ टक्के महिला खासदार व २०१५ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी मध्ये ७ टक्के महिला आमदार निवड होणे म्हणजे स्त्रि-पुरूष समानतेच्या दृष्टीने चिंताजनक असुन त्यातही या महिला खासदार व आमदारांमध्ये आदिवासी महिलांचे प्रतिनिधीत्व नगण्यच आहे. तसेच १४ एप्रिल २०११ पासुन महिलांना पंचायतराज मध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले. प्रत्यक्षात पंचायतराज मध्ये ज्या महिला सदस्य व पदाधिकारी म्हणून निवडुन आल्या त्यांना पतिसंस्कृती, पुरूषप्रधानता आणि सामाजिक बंधनामुळे पंचायतराज कारभारामध्ये कामकाज करताना दुय्यम स्थान मिळाल्याचे दिसुन येते.



या संदर्भाने नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मध्ये सहभागी होताना अनेक समस्या असल्याचे दिसुन येते. नंदुरबार तालुक्यात १४९ ग्रामपंचायती असुन २०११ च्या जनगणने नुसार ६९.८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. आदिवासी बहुल लोकसंख्येच्या नंदुरबार तालुक्यात आदिवासी जीवनशैली च्या प्रभावामुळे शिक्षणापासुन दुर असलेल्या आदिवासी स्त्रिया आरक्षणा द्वारे मिळालेल्या पदाचा वापर स्वत: आदिवासी स्त्रियांनीच केल्यास लोकशाही विकेंद्रीकरण प्रत्यक्षात येणे शक्य होईल.

## प्रस्तावना :- (Introduction)

प्राचीन कालखंडा पासून ग्रामीण स्थानिक व्यवस्था चलविण्यासाठी पंचायतीचे अस्तित्व असल्याचे प्राचीन वाडमयावरून दिसुन येते. पंचायती गावातील लोकांनी संरक्षण देउन तंटे व संघर्ष सोडविण्याचे कार्य करत असे. स्वातंत्र्या नंतर महाराष्ट्रामध्ये वसंतराव नाईक समितीच्या शिफारशी नुसार स्थानिक शासन निर्मिती करण्यात आली. मात्र पंचायतराज मधील महिलांचया सहभागाची स्थिती चिंताजनक राहिल्याचे दिसते. प्रस्तुत लघुशोध निबंधामध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचा नंदुरबार तालुक्या संदर्भाने विचार केलेला आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेकडील खानदेशातील नंदुरबार हा आदिवासी बहुल तालुका आहे. सातपुडयाच्या डोंगरदऱ्यात आणि जंगलांच्या सान्निध्यातील जीवनशैली मुळे आदिवासी लोकांना स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये सहभाग घेताना अनेक समस्या असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र शासनाकडुन आदिवासी विकासाचे अनेक प्रकल्प व विकास योजना राबविलेल्या आहेत. मात्र, आदिवासी जनतेच्या पंचायतराज मधील सहभागा शिवाय या सर्व योजना राबविणे कठिण आहे. पुर्वापार पासुन दुर्लक्षित असलेला अदिवासी समाज आजही दारिद्रय व गरिबी अणि शिक्षणाचा अभाव यामुळे पंचायतराज मध्ये सहभाग घेण्यापासुन दुरच असल्याचे दिसते. नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे अध्ययनासाठी अनुसूचित जमातीच्या महिला प्रतिसादकांकडून नमुना निवडी द्वारे अभ्यास करण्यात आला.

### अभ्यासाचे उद्देश :- (objective of Research)

१. नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे अध्ययन करणे.
२. नंदुरबार तालुक्यातील महिलांच्या सहभागाच्या समस्यांवर उपाययोजना शोधणे.

### गृहितकृत्य :- (Hypothesis)

नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांना पंचायतराज मध्ये सहभागी होताना अनेक समस्या कारणीभुत ठरतात.

### संशोधन पध्दती :- (Methodology)

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे आढावा घेण्यासाठी व नंदुरबार तालुक्यातील महिलांच्या सहभागाच्या समस्यांवर उपाययोजना शोधणे साठी प्रस्तुत लघुशोध निंबंधासाठी द्वितीयक तथ्ये सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेवून निष्कर्षा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### व्याप्ती आणि मर्यादा :- (Scope & Limitation)

प्रस्तुत लघुशोध निबंधामध्ये नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांचा अभ्यास करण्यात आलेला असला तरी त्यापैकी नमुना निवडीद्वारे अनुसूचित जमातीच्या महिलाचीं निवड व्यष्टी अध्ययना साठी करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे आढावा घेण्यासाठी व नंदुरबार तालुक्यातील महिलांच्या सहभागाच्या समस्यांवर उपाययोजना शोधणे साठी प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे तथ्यसंकलन करताना अनुसूचित जमातीच्या महिला पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यां संदर्भात माहिती देताना निरक्षरते मुळे अडथळे आल्याचे दिसून आले त्यामुळे माहिती मिळताना ही मर्यादा आली.

### अभ्यास क्षेत्र:- (Study Area)

प्रस्तुत लघुशोध निबंधामध्ये नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे अध्ययन करण्यासाठी नंदुरबार तालुक्याची निवड केलेली आहे. नंदुरबार हे जिल्हयाचे ठिकाण असुन १९९८ मध्ये धुळे जिल्हयाची विभागाणी करून त्याची निर्मिती करण्यात आली. प्रस्तुत अभ्यास क्षेत्र २१° ०० ते २२° ०० उत्तर अक्षांश आणि ७३° ३१ ते ७४° ३२ पुर्व रेखांश दरम्यान विस्तारलेले आहे. तसेच या तालुक्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे.





Fig. 1

स्त्रोत:- www.mapsofindia.com

### संशोधन समस्या :- (Research Problems)

नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांना पंचायतराज मध्ये सहभागी होताना अनेक समस्या दिसुन आहेत. याचसंदर्भाने अनुसूचित जमातीच्या महिलांना पंचायतराज मध्ये सहभागी होताना कोणत्या समस्या असतात याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे विश्लेषण :-

संविधानाने दिलेले हक्क उपभोगण्यासाठी राजकीय सहभाग गरजेचा झाला. लोक राजकीय सहभागा बद्दल जागरूक असतील तर शासनावर नियंत्रण ठेवता येते. विकांसाची प्रक्रिया गतिमान करता येते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नंदुरबार तालुक्यातील ग्रामीण समाजाच्या सर्वांगिण प्रगती साठी ग्रामसंस्थाचे योगदान महत्वाचे आहे. मात्र, इतर मागास वर्गीय, अनुसूचित जाती आणि जमाती, विशेष मागासवर्ग यांना ग्रामपंचायती मध्ये आरक्षणच्या धोरणा द्वारे संधी मिळालेली दिसून येत असली तरी आरक्षणा नुसार फक्त राजकीय पदे मिळाली मात्र, लोकांच्या मनातून सामाजिक विषमतेच्या प्रवृत्ती गेलेली नसल्याने लोक मागास वर्गीय आणि आदिवासी नेतृत्वास मान्य करित नाही. पुर्वापार पासून सर्व अनुसूचित जाती व जमाती आणि मागासवर्गीय यांना चातुर्वर्ण व्यवस्थेने शिक्षण आणि ज्ञानापासून वंचित ठेवले, दुय्यम प्रकारची वागणूक दिली. त्यामुळे हा सर्व समाज आजही शिक्षणा पासून काही अंशी दूरच आहे. त्याचा परिणाम आरक्षणा द्वारे पदे मिळूनही स्वत:ची निरक्षरता त्या पदाधिकाऱ्याना स्वत:साठीच अडसर ठरत आहे.

पुर्वीच्या काळी ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही होती. तेव्हा जनतेचा शंभर टक्के सहभाग असे. आधुनिक लोकशाही मध्ये तसे शक्य नसले तरी आवश्यक तेथे जनसहभाग गरजेचा ठरतो. भारतीय राज्यघटनेत पत्यक्ष लोकशाही मार्गाच्या तरतुदी नाही. असे असले तरी स्थानिक शासना पासून केंद्र सरकार पर्यत सहभागाच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ग्रामसभा, निवडणुक, आंदोलने अशा विविध साधनां द्वारे लोक राजकीय प्रक्रियेत सहभाग होत असतात. प्रामुख्याने आदिवासी भागातील जनसहभाग आदिवासीच्या वैविध्यपुर्ण जीवनशैली आणि विविध घटका मुळे प्रभावित होत असतो. या संदर्भात नंदुरबार तालुक्यातील लोकसंख्येचा आढावा पुढील सारणी आधारे स्पष्ट होतो.

**सारणी क्र.- १**
**नंदुरबार तालुका प्रोफाईल**

| अ.क्र. | | एकुण | शहरी | ग्रामीण |
|---|---|---|---|---|
| ०१ | एकुण लोकसंख्या | ३६७४४६ | १११०३७ | २५६४०९ |
| ०२ | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | १६७४३१ | १३६५७ | १५३७७४ |
| ०३ | साक्षरता | ७१.३६% | ७८.७१% | ६४.०१% |

स्त्रोत:- www.*censusindia.gov.in*.

नंदुरबार तालुक्यातील एकुण लोकसंख्येत अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ४५.५६ टक्के इतके आहे. तालुक्यातील एकुण लोकसंख्ये पैकी ३०.२ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करत असुन ६९.८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. अनुसूचित जमातीची ८.१२ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करत असुन ९१.८८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. यावरून बहुसंख्य आदिवासी ग्रामीण भागातच स्थायिक असल्याचे स्पष्ट होते. नंदुरबार तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण ७१.३६ टक्के आहे.

**सारणी क्रमांक- २**
**नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या**

| अ.क्र. | एकुण अनुसूचित जमातीची लोकसंख्या | पुरूष | स्त्रिाया |
|---|---|---|---|
| ०१ | १६७४३१ | ८३०९५ | ८४३३६ |

स्त्रोत:- www.*censusindia.gov.in*.

नंदुरबार तालुक्या मध्ये अनुसूचित जमातीची एकुण लोकसंख्या १६७४३१ असुन त्यामध्ये पुरूषांचे प्रमाण ४९.६२ तर स्त्रियांचे प्रमाण ५०.३७ टक्के आहे. यावरून अनुसूचित जमातीच्या महिलांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसुन येते.

नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागाच्या समस्यांचे अध्ययन करणे आणि नंदुरबार तालुक्यातील महिलांच्या सहभागाच्या समस्यांवर उपाययोजना शोधणे. या संशोधन उदिष्टांना अनुसरून नंदुरबार तालुक्यातील जनसहभागाचा विश्लेषणात्मक अभ्यास द्वारे जनसहभाग कमी असल्याच्या कारणांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आला आहे.

७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामसभेला घटनात्मक दर्जा मिळवून दिला. या मागचा मुख्य हेतू म्हणजे पंचायतराज संस्थाना अधिक सशक्त करणे हा होता. लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व प्रत्यक्ष साकार करण्यासाठी लोकसहभाग अत्यंत महत्वाची ठरतो. मात्र, लोकांची उदासीनता, ग्रामीण समाजातील निरक्षरता, सामाजिक विषमता आदी बाबी मुळे अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागा मध्ये समस्यां निर्माण होतात. अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभागा मध्ये समस्यांचा तपशील पुढील सारणी क्र. ३ द्वारे स्पष्ट होतो.

सारणी क्र. ३
पंचायतराज मध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांच्या सहभागा मधील समस्या

| अ. क्र. | पंचायतराज मध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांच्या सहभागा मधील समस्या | होय म्हणणाऱ्या महिला उत्तरदात्यांची संख्या (एकुण १५) | सहभागा मधील समस्यांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | लोकांची उदासीनता | १२ | ८०.०० |
| २ | निरक्षरता अडथळा ठरतो का? | १३ | ८६.६६ |
| ३ | सामाजिक विषमता | १४ | ९३.३३ |
| ४ | पुरूषप्रधानता | १५ | १०० |

आधारः प्रत्यक्ष सर्वेक्षण- वर्ष फेब्रुवारी २०१७

वरिल सारणी क्रमांक ३ द्वारे अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मध्ये सहभागाच्या समस्या काय आहेत हे लक्षात येते. १२ (८० टक्के) प्रतिसादक महिलांच्या मते, उदासीनते मुळे पंचायतराज मध्ये ग्रामीण जनतेची ग्रामपंचायतीकडे पाहण्याची उदासीन प्रवृत्ती जनसहभाग घटविते. १३ (८६.६६ टक्के) प्रतिसादक महिलांच्या मते, निरक्षरता मुळे पंचायतराज मध्ये लोकांना निरक्षरते मुळे पंचायतींचे फायदे लक्षात येत नाही. योजनांची माहिती, नियम समजून घेणे अवघड जाते परिणामी निरक्षरता समस्या बनते. १४ (९३.३३ टक्के) प्रतिसादक महिलांच्या मते, सामाजिक विषमते मुळे पंचायतराज मध्ये जनसहभाग घटतो. १५ (१०० टक्के) प्रतिसादक महिलांच्या मते, पुरूषप्रधानते मुळे पंचायतराज मध्ये महिलाना सहभाग घेणे शक्य होत नाही. यावरून अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभाग उदासीनता, निरक्षरता, सामाजिक विषमता आणि पुरूषप्रधानता या कारणांमुळे प्रभावित होत असल्याचे स्पष्ट होते.

सर्वेक्षणाच्या वेळी प्रतिसादक अनुसूचित जमातीच्या महिलांशी केलेल्या चर्चेतुन पुढील सहभागाच्या समस्या असल्याचे स्पष्ट झाले.

**लोकांची उदासीनता :-** ग्रामसंस्थाकडून आलेल्या वाईट अनुभवामुळे व्यक्ती स्थानिक राजकारणापासून दुर राहणे पसंत करतात. स्थानिक राजकीय व्यवस्थेबद्दल नकारात्मक भावना तयार होतात. स्थानिक राजकीय व्यवस्था आणि राजकारणाशी आपले काहीही देणेघेणे नाही अशी भावना परिदृढ होते. त्यामुळे अशा व्यक्ती ग्रामसभांमध्ये सहभाग घेण्याचे टाळत असतात. अशा व्यक्तीना पंचायतराज पासून मिळणारे फायदे थोडयाफार प्रमाणात माहित असले तरी त्यांनी राजकीय सहभागाबाबत कुठलाही रस नसतो. अशा व्यक्ती मानसिक दृष्टया उदासीन बनतात.

**निरक्षरता:-** शिक्षणामुळे राजकीय प्रक्रियेबद्दल व्यक्ती जागृक होतो. मात्र नंदुरबार तालुक्यातील ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळीच असलेली दिसते. आजही खेडयांमध्ये अशिक्षितांची संख्या दिसून येते. त्यांचा ग्रामसभेतील सहभागही कमी असल्याचा दिसून येतो. तसेच खेडयांमध्ये बोटावर मोजण्या इतपत व्यक्ती उच्चविदयाविभूषीत असून त्यांनीही पंचायतराजकडे पाठ फिरवलेली दिसते. म्हणून शिक्षणतुन पंचायतराजचे महत्व ग्रामीण समाजाला पटवून देणे गरजेचे ठरते. ग्रामीण समाजात शिक्षणाच्या प्रमाण कमी असल्याने काही व्यक्ती समाजातील प्रत्येक गोष्टीकडे कुचेष्टेने पाहत असतात. राजकारणाकडे पुर्वग्रह दुषित नजरेने पाहण्यातच अशा व्यक्तींना धन्यता वाटत असते. अशा व्यक्ती राजकारणा कडे नेहमीच तिरस्काराने पाहत असतात. त्यामुळे पंचायतराज मध्ये सहभाग घेण्यासाठी अशा व्यक्ती उत्साही नसतात. परिणामी राजकीय सहभाग कमी असलेला दिसून येतो.

**पुरूष प्रधानता:-** नंदुरबार तालुक्यातील पंचायतराज मध्ये पुरूषा पेक्षा स्त्रियांची उपस्थिती कमी दिसुन येते. तसेच स्त्रियाची सामाजिक स्थिती पुरूषापेक्षा दुय्यम असलेली दिसून येते. आजही खेडयामधील अधिवासी समुहाच्या स्त्रियाचे राजकीय सहभागाचे प्रमाण अल्प दिसून येते.

**सामाजिक विषमता:-** गावातील जातीय विषमता देखील ग्रामसभेतील सहभागावर प्रभाव टाकते. पुर्वापार पासुन विशिष्ट जातीच्या हातात या ग्रामसंस्था असल्याने अनुसूचित जमातीच्या महिला पंचायतराज बाबत उदासीन बनतात. पंचायतराज मध्ये आपण दुर्लक्षितच राहतो. अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. आरक्षण धोरणानुसार जर एखादया ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदावर दलित, अदिवासी किंवा मागासवर्गीय व्यक्ती आली तरी प्रत्यक्ष गावातील सत्ता प्रस्थापित लोकांच्या हातातच असते. म्हणून खेडयांमधील जाती व्यवस्था कायदयाने जरी मोडीत काढलेली असली तरी लोकांच्या मनातुन गेलेली दिसून येत नाही.

**व्यवसाय:-** नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांचा रोजगार शेती व मजुरी हाच मुख्य असल्याने शेतकामांचे व्यस्त स्वरूपामुळे ग्रामसभांना व राजकीय सहभाग फारच कमी असतो. शेतकाम व्यतीरिक्त सरकारी नोकर व इतर व्यावसायिक देखील आपल्या कामामुळे ग्रामसभांना व राजकीय सहभाग नसल्याचे चित्र दिसुन येते.

**निष्कर्ष :- (Major findings)**

१. समाजातील वाईट अनुभवामुळे व्यक्ती स्थानिक राजकारणापासून दुर राहणे पसंत करतात. स्थानिक राजकीय व्यवस्थेबद्दल नकारात्मक भावना तयार होतात. त्यामुळे अशा व्यक्ती ग्रामसभांमध्ये सहभाग घेण्याचे टाळत असतात. अशा व्यक्ती मानसिक दृष्टया उदासीन बनतात.
२. नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांची अशिक्षितांची संख्या जास्त दिसून येते. त्यांचा प्रभाव पंचायतराज मधील महिलांचा सहभागही कमी असल्याचा दिसून येतो.
३. स्त्रियाची सामाजिक स्थिती पुरूषापेक्षा दुय्यम असल्याने नंदुरबार तालुक्यातील पंचायतराज मध्ये पुरूषा पेक्षा स्त्रियांची उपस्थिती कमी दिसुन येते.
४. पुर्वापार पासुन विशिष्ट जातीच्या हातात या ग्रामसंस्था असल्याने अनुसूचित जमातीच्या महिला पंचायतराज बाबत उदासीन बनतात.
५. नंदुरबार तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या महिलांचा रोजगार शेती व मजुरी हाच मुख्य व्यवसाय असल्याने शेतकामांचे व्यस्त स्वरूपामुळे राजकीय सहभाग फारच कमी असतो.

**उपाययोजना :-**

१. आदिवासी महिलांच्या शिक्षणावर भर दिल्यास त्यांना पंचायतराज मधील सहभागाचे गांभिर्य लक्षात येईल.
२. स्त्रियाची सामाजिक स्थितीत सुधारणा घडवुन आणण्यासाठी जागृती आणली जावी तसेच महिलांना आरक्षणा द्वारे मिळालेले पद स्वतः वापरण्याची संधी दयावी.
३. अनुसूचित जमातीच्या महिलांची राजकीय अनास्था कमी करण्यासाठी सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण होणे गरजेचे आहे.
४. आदिवासी महिलाना प्रचायतराज संस्थांच्या माध्यमातुन रोजगार मिळणाऱ्या योजनांचा फायदा मिळवुन दिल्यास स्थानिक राजकीय व्यवस्थेबद्दल नकारात्मक भावना कमी होईल.

**समारोपः- (Conclusion)**

अनुसूचित जमातीच्या महिलांच्या सहभाग पंचायतराज मध्ये मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे कमी असल्याचे दिसून येतो. या सर्व घटका बरोबर अनुसूचित जमातीच्या महिलांची सभोवतालची परिस्थिती व वातावरणाचा राजकीय सहभागावर प्रभाव पडत असतो. गावातील स्थानिक परिस्थिती नुसार मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणे राजकीय सहभागावर प्रभाव पाडतात.

जनसहभागा शिवाय स्थानिक शासनाचे धोरणे व योजना राबविणे कठीण आहे. सर्वच ठिकाणी राजकीय सहभाग सारखा नसतो. अनुसूचित जमातीच्या महिलांच्या पंचायतराज मधील सहभाग उदासीनता, निरक्षरता, सामाजिक विषमता आणि पुरूषप्रधानता या कारणांमुळे प्रभावित होत असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :- (Reference)**

१. आर.जी. मुळीक, पंचायती राज्य, प्रथमावृत्ती, सांगली, १९९८.
२. अर्जूनराव दर्शनकार, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलाश पाब्लिकेशन्स, औरंगाबाद.
३. शांताराम भोगले, भारतातील स्थानिक शासन, विदया प्रकाशन नागपूर.
४. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८७.
५. डॉ. एस. आर्जुने, पंचायतराज व्यवस्था व बदलती समिकरणे हा संशोधन लेख, योजना, एप्रिल २००७
६. वा.भा. पाटील, पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, जळगाव, २००९.
७. व्ही. बी. पाटील, पंचायतराज, के सागर पब्लिकेशन, पुणे, २००५.
८. श्रीनिवास कुलकर्णी, ७३ व्या घटना दुरूस्ती व पंचायतराज चे अडथळे, हा संशोधन लेख, पंचायतराज, आक्टोंबर २००८.
९. स्त्रोतः- www.*censusindia.gov.in*.